पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

जनसंपर्क अधिकारी
दि.२१/०२/२०२६.

## -: जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई :-
## " दोन वाईन शॉप फोडणारा सराईत चोरटा १२ तासांत गजाआड."

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | रिपोर्ट देणारे |
| --- | --- | --- |
| जिल्हापेठ पो.स्टे. | 36/2026, भा.न्या.सं.क. 305(अ), 331(4) प्रमाणे. | पो.उप.निरी.शरद बागल, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव. |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **गुन्हा उघड तारीख** |
| तांत्रिक व गोपनिय | दि.20/02/2026 रोजी 11.45 वा. | दि.20/02/2026 |

**गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार.**

मा.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव.
मा.श्री.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक,जळगांव परिमंडळ.
मा.श्री.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,जळगांव उपविभाग, जळगांव.
यांचे मार्गदर्शनाखाली
श्री.राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव.
पोलीस उप निरीक्षक शरद बागल, सहा.फौज.अतुल वंजारी, पो.हे.कॉ.विजय पाटील, नितीन बाविस्कर, अक्रम शेख, उमाकांत पाटील, पो.ना.अ.किशोर पाटील आणि पो.अ.रवींद्र कापडणे व प्रशांत परदेशी, नेत्रम विभागातील पोअ.मुबारक देशमुख,

| | | |
| --- | --- | --- |
| आरोपीचे नांव व पत्ता :- | 1) आरोपी रामनिवस मंजू गुप्ता (वय ३७ वर्ष, रा. राम नगर, कल्याण, जि. ठाणे) | |
| आरोपी अभिलेख :- | 1) सानपाडा पो.स्टे. (ठाणे शहर) गुरनं. 100/2021 , भादंविक. 457, 454, 380 प्रमाणे.<br>2) नेरुळ पो.स्टे. (नवी मुंबई) गुरनं. 318/2021, भादंविक. 457, 454, 380 प्रमाणे.<br>3) ठाणे शहर पो.स्टे.(ठाणे शहर) गुरनं. 169/2022, भादंविक. 457, 454, 380 प्रमाणे.<br>4) काशिमिरा पो.स्टे.(मिरा-भाईदंर पो.आयु.)गुरनं.169/2022,भादंविक. 457, 454, 380 प्रमाणे.<br>5) काशिमिरा पो.स्टे.(मिरा-भाईदंर पो.आयु.) गुरनं.46/2023, भादंविक. 457, 454, 380 प्रमाणे.<br>6) नालासोपारा पो.स्टे.(मिरा-भाईदंर पो.आयु.)गुरनं.573/2024,भान्यासंक.438,331,331(4) प्रमाणे.<br>7) कोरेगांव पार्क पो.स्टे.(पुणे शहर) गुरनं.60/2025, भा.न्या.सं.क. 438,331,331(4) प्रमाणे.<br>8) जिल्हापेठ पो.स्टे.(जळगांव) गुरनं. 36/2026, भा.न्या.सं.क. 305(अ), 331(4) प्रमाणे.<br>9) एमआयडीसी पो.स्टे.(जळगांव) गुरनं. 124/2026, भा.न्या.सं.क. 305(अ), 331(4) प्रमाणे. | |
| जप्त मुद्देमाल :- | १)जिल्हापेठ पो.स्टे. (प्रिन्स वाईन शॉप) चोरीतील रक्कम: | १,५८,०००/- |
| | २)MIDC पो.स्टे. (राज वाईन्स) चोरीतील रक्कम: | ०,४६,०००/- |
| | ३)वाहन: गुन्ह्यात वापरलेली बजाज अव्हेंजर मोटारसायकल | १,००,०००/- |
| | असा एकुण जप्त मुद्देमाल: | ३,०४,०००/- |

**-: गुन्हयाची थोडक्यात हकिगत :-**

दिनांक १९/०२/२०२६ रोजी रात्रीच्या सुमारास जिल्हापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील भजे गल्ली येथे असलेल्या **'प्रिन्स वाईन शॉप'** चे शटर तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील २,५०,०००/- रुपये रोख चोरून नेले होते. तसेच एम.आय.डी.सी. पो.स्टे. हद्दीमध्ये अजिंठा चौफुली जवळील राज वाईन शॉपचे शटर तोडून १,२५,०००/- चोरुन नेले होते.याप्रकरणी अनुक्रमे - फिर्यादी श्रीराम रामचंद्र भोई यांच्या तक्रारीवरून जिल्हापेठ पोलीस स्टेशनला गु.र.नं.००३६/२०२६ बी.एन.एस.कलम ३०५(a), ३३१(४) प्रमाणे , फिर्यादी - राजेंद्र युवराज सोनवणे, यांच्या तक्रारी वरुन एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशनला गु.र.नं. १२४/२०२६, बी.एन.एस.कलम ३०५(a), ३३१(४) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

**-: पोलीस कारवाई आणि तपास:-**

एकाच रात्रीत (०२) वाईन शॉपचे दुकान फुटल्यामुळे गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.राहुल गायकवाड व त्यांच्या पथकाने तांत्रिक बाबींच्या आधारे तपास चक्र फिरवले. सदर गुन्हयांचा स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव कडिल तपास पथक हे समांतर तपास करीत असतांना अत्यंत चपळाईने तपास करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या १२ तासांच्या आत या गुन्ह्याचा छडा लावून संशयित **आरोपी-रामनिवस मंजू गुप्ता, (वय ३७ वर्ष,रा.राम नगर,कल्याण,जि.ठाणे** यास निष्पन्न करुन त्यास ताब्यात घेवून त्याने गुन्हा करतांना वापरलेली बजाज अँव्हेंजर मोटार सायकल देखील गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आली आहे. त्याने जिल्हापेठ येथील 'प्रिन्स वाईन शॉप' आणि MIDC पोलीस स्टेशन हद्दीतील 'राज वाईन्स' मध्ये चोऱ्या केल्याची कबुली दिली आहे. तसेच सदरचा आरोपी हा मुळचा उत्तर प्रदेश येथील रहिवासी असून त्याचेवर मुंबई शहर, नवी मुंबई , ठाणे शहर, मिरा भाईदर आयुक्तालय, नाशिक आयुक्तालय या ठिकाणी चोरी केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून तो गुन्हा करतांना एकटाच गुन्हा करतो. तसेच त्याचेवर महाराष्ट्रातील विविध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत.

जिल्हापेठ पो.स्टे.कडिल गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.निरी.गोपाल देशमुख, व एमआयडीसी पो.स्टे.कडिल गुन्हयाचा पुढील तपास पोहेकॉ.भगवान चौधरी हे करीत आहोत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळग


स्थानिक गुन्हे शाखा
रेकॉर्ड रुम